तात्काळ/कालमर्यादा/महत्वाचे

क्र.पोमसं/३१/३९-१/घबांअ/२०२४-२५/१३३/२०२४ मुंबई, दिनांक २७/०९/२०२४

**विषय :- निधी वितरण सन २०२४-२५**
मागणी क्र.बी-११, लेखाशिर्ष-७६१० शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे मधील गौणशिर्ष २०१-घरबांधणी अग्रीमबाबत..

**आदेश**

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.बीयुडी ०५२४/प्र.क्र.११३/आस्था-१, दि.०२/०८/२०२४ अन्वये सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षासाठी मागणी क्र.बी-११, लेखाशिर्ष-७६१० शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे मधील गौणशिर्ष २०१-घरबांधणी अग्रीमासाठी शासनाने बीडीएस प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेल्या रु.१४,९४,६४,०००/- (अक्षरी रुपये चौदा कोटी चाऱ्याण्णव लाख चौसष्ट हजार फक्त) इतक्या घरबांधणी अग्रीमापैकी दि.१४/०८/२०२४ च्या आदेशानुसार निधी वाटप केल्यानंतर या कार्यालयाच्या बीडीएस प्रणालीवर शिल्लक राहिलेला रु.८,३९,६१३/- इतका निधी आणि पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचेकडून परत घेतलेला रु.३,१६,५००/- इतका निधी असा एकूण रु.११,५६,११३/- (अक्षरी रुपये अकरा लाख छप्पन हजार एकशे तेरा फक्त) इतका निधी या कार्यालयाच्या बीडीएस प्रणालीवर वितरीत करण्याकरिता उपलब्ध आहे.

२. पोलीस महासंचालक कार्यालयाच्या प्रतिक्षायादीवरील पुढील कार्मचारी कश्रेलि ममता नरेंद्र पराते, नेम.पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचेकरिता रु.८,४०,०००/- (अक्षरी रुपये आठ लाख चाळीस हजार फक्त) एवढया रकमेस सदर आदेशान्वये मंजूरी देण्यात येत आहे. विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुखांनी केलेल्या मागणीनुसार जिल्हा कोषागार, आहरण व संवितरण क्रमांक या खाली स्वतंत्रपणे अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे निधी वितरीत करण्यात येत आहे.

३. सोबतच्या विवरणपत्रातील अग्रीमधारक यांनी मागणी केल्यानुसार व वित्त विभाग, शासन निर्णय क्र.घबांअ-२०२३/प्र.क्र.३१/२०२३/विनियम, दि.०१/०३/२०२४ मधील तरतुदीनुसार अग्रीम धारकास देय असलेली रक्कम विचारात घेवून **एकूण रु.८,४०,०००/- (अक्षरी रुपये आठ लाख चाळीस हजार फक्त) इतका निधी पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे.** (प्रत संलग्न).

४. सोबतच्या विवरणपत्रातील रकाना क्र. ७ मध्ये दर्शविलेल्या विभाग प्रमुखांनी शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्रक्र-३०/२०१३/विनियम,भाग-२, दि.१७/४/२०१५ अन्वये मुंबई वित्तीय नियम १९५९ अंतर्गत नियमाखाली प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका - १९७८ भाग पहिला उपविभाग - एक मधील अनुक्रमांक ११ नियम १३४ अन्वये संबधित अधिकारी / कर्मचा-यांचे घरबांधणी अग्रिम मंजूर केल्याचे स्वतंत्र आदेश निर्गमित करावेत.

५. विभाग प्रमुख / घटक प्रमुखांना सुचित करण्यात येते की, शासनाने वित्त विभाग, शासन निर्णय क्र.घबांअ-२०२३/प्र.क्र.३१/२०२३/विनियम, दि.०१/०३/२०२४ अन्वये घरबांधणी अग्रीमाच्या कमाल मर्यादेत व व्याज दरात सुधारणा केली आहे. सदर शासन निर्णयातील विहीत सर्व अटी व शर्तीची कोटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच, त्यांचे स्वतंत्र मंजूरी आदेश निर्गमित करताना त्यामध्ये सदर अटी / शर्तीचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

६. घटक प्रमुखांनी त्यांना वितरीत केलेल्या निधीचा विनियोग संपूर्णत: न केल्यास किंवा निधी व्यपगत झाल्यास त्याची सविस्तर कारणे शासनास व लोकलेखा समितीस सादर करावी लागतात, त्यामुळे निर्देश देण्यात येत आहेत. की, कार्यालय प्रमुखांनी संबंधित कोषागार कार्यालयास त्यासंबंधीची देयके सादर करुन सदरची देयके **त्वरीत** पारित करुन घ्यावीत. तसेच संबंधीत अधिकारी / कर्मचाऱ्यांना घरबांधणी अग्रीम अदा करणेची सर्वस्वी जबाबदारी सर्व संबंधित घटक प्रमुखांची असल्यामुळे त्यांनी सदर प्रकरणांची तातडी व गांभीर्य लक्षात घेऊन या प्रकरणी वैयक्तिकरित्या लक्ष देऊन त्यांचे कार्यालयातील लेखाविषयक कामकाज करणारे लेखा अधिकारी / सहाय्यक लेखा अधिकारी / लिपिक वर्गीय अधिकारी / कर्मचारी यांना त्याप्रमाणे विहीत कालावधीत अचूक व परिपूर्ण कामे करण्याबाबत सक्त सूचना द्याव्यात. जेणेकरुन शासनाने चिन्हांकित करून दिलेल्या निधीचा विनियोग पूर्णत: होईल संबंधीतांना घरबांधणी अग्रिम रक्कम अदा केल्यानंतर त्यांची दिनांकित अदारोल पावती, देयकाचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक या कार्यालयास / शासनास व महालेखापाल- १ मुंबई / महालेखापाल-२ नागपूर / अधिदान व लेखा कार्यालय मुंबई यांना सादर करावा. शासन निर्णय, वित्त विभाग दि.०१/०३/२०२४ मधील परि. ७ (८) आणि शासन निर्णय वित्त

विभाग क्र.अग्रिम-१०००/प्र.क्र.१३/२०००/विनियम, दि.०५/०९/२००० मधील विहीत नमुन्यात याबाबतची नोंद अग्रीम धारकाच्या सेवापुस्तकात / सेवापटात न चुकता घेण्यात यावी.

७. असेही निर्देश देण्यात येत आहेत की, उपलब्ध करुन दिलेल्या वरील रकमेच्या खर्चाचा ताळमेळ, महालेखापाल यांचे कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी / महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण - १४ मधील नियम १५७ च्या परिशिष्ट ३ तसेच शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार योग्य प्रकारे व योग्यवेळी करुन त्याबाबतची प्रमाणित माहिती, शासनास विहीत मुदतीत पाठविण्यात यावी. शासनाने चिन्हांकित करुन दिलेल्या निधीनुसार या कार्यालयाने मंजूर केलेल्या अग्रिमाच्या खर्च मेळ्याची प्रमाणित माहिती महालेखापाल यांचे कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची **संपूर्ण जबाबदारी क्षेत्रीय विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांची राहील याचीही कृपया नोंद घ्यावी.** तथापि, त्याप्रमाणे माहिती न पाठविल्यास कार्यालयातील संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करणे भाग पडेल याची कृपया नोंद घ्यावी. प्रमाणित न केलेली माहिती स्वीकारण्यात येणार नाही. या कारणामुळे विलंब झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी क्षेत्रीय विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांची राहील याचीही कृपया नोंद घ्यावी.

८. **शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना अग्रिमाचे दुबार वाटप होणार नाही याची दक्षता घ्यावी.** त्याचप्रमाणे अग्रिमधारक अनधिकृत रजेवर राहिल्यास अथवा इतर अन्य कोणत्याही कारणास्तव त्याच्या कर्तव्यापासून दूर राहिला, अन्य विभाग / कार्यालयात बदली झाली तरीही शासन निर्णय, वित्त विभाग दि.०१/०३/२०२४ मधील परि.७ (१२) (१३) नुसार घरबांधणी अग्रीम रकमेच्या आणि व्याजाच्या नियमीत व योग्य वसुलीसाठी संबंधित अग्रीमधारक स्वत: जबाबदार राहील असे अग्रीमाधारकास अवगत करावे.

९. **शासकीय अधिकारी / कर्मचा-यांना मंजूर करण्यात आलेले अग्रीम ज्या प्रयोजनाकरिता मंजूर केले आहे त्या कारणाकरिता त्याचा विनियोग न केल्यास किंवा विनियोग प्रमाणपत्र, वैयक्तीक बंधपत्र / जामीनखत, गहाणखत व तत्सम आवश्यक दस्तऐवज विहित मुदतीत कार्यालयाकडे सादर न केल्यास किंवा अग्रीम व व्याज परतफेडीच्या संदर्भातील अटी व शर्तींचे पालन न केल्यास किंवा त्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास कसुरदाराकडून अग्रीमाची रक्कम, प्रचलित व्याजदर + २.७५ टक्के दंडनीय व्याज यासह एकरकमी वसूल करण्यात यावी.** अर्जदारास मंजूर केलेला अग्रीम ज्या प्रयोजनाकरिता मंजूर केला आहे त्या कारणाकरिताच त्याने खर्च केल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र (कंत्राटदार यांची रक्कम मिळाल्याची पावती) अग्रीम धारकाने संबंधीत कार्यालयास एक महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.

१०. सदरचा खर्च सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षातील गृह विभाग मागणी क्र. बी-११ मुख्यलेखाशिर्ष ७६१०- शासकीय कर्मचारी इ.कर्जे मधील गौणशिर्ष २०१- घरबांधणी अग्रिम (सांकेतांक क्रमांक ७६१०००८७) अन्वये खर्च करण्यात यावा व सदरचा खर्च याच लेखाशिर्षाखाली नोंदविला गेला आहे, याची खातरजमा करावी.

**(डॉ.आरती सिंह)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, म.राज्य, मुंबई.

**प्रति,**
पोलीस आयुक्त, नागपूर शहर

Deks/thispc/acer d/desk-31/hba order draft

पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुख्यलेखाशिर्ष -७६१०, शासकिय कर्मचारी इत्यादींना कर्जे, वित्तीय वर्षे २०२४-२५, मागणी क्रमांक ११-बी, गौणशिर्ष २०१, घरबाधंणी अग्रिम आदेश दि. दि. २७/०९/२०२४

| अ.क्र | नाव | सेवार्थ क्रमांक | पदनाम | सेवाभरती दि. | सेवानिवृत्ती दि. | विभाग प्रमुख | घटक कार्यालय | एकुण देय रक्कम | प्रत्यक्ष वितरीत करण्यात येणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | ममता नरेंद्र पराते | DGPMNPF९१०१ | कश्रेलि | १३.०७.२०१५ | ३०.०१.२०४९ | पोलीस आयुक्त, नागपूर शहर | पोलीस आयुक्त, नागपूर शहर | २१,००,०००/- | दुसरा हप्ता (४०%) ८,४०,०००/- |
| | | | | | | | | एकूण रक्कम रु.८,४०,०००/- | |